**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टे सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक ३०८ । बुधवार ९ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# कायदा-सुव्यवस्थे राखण्यासाठी लोकप्रतिनिधींशी समन्वय गरजेचा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने चर्चेत येत आहे. शहरात अस्वस्थतेचे वातावरण आहे. मुकुंदनगर परिसरात धीरज परदेशी या तरुणाच्या हत्येनंतर शहरात निर्माण झालेली सामाजिक धग अद्याप शांत झालेली नाही. अशा संवेदनशील परिस्थितीत शहरातील शांतता टिकवून ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात सुसंवाद असणे अत्यंत गरजेचे असते. मात्र, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे व शहराचे लोकप्रतिनिधी आमदार संग्राम जगताप यांच्यातील विसंवाद सातत्याने समोर येत असल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने लोकप्रतिनिधींशी समन्वय वाढविणे ही गरज बनली आहे. ■ पान ४ वर

### प्रशासकीय समन्वय काळाची गरज

निवडून आलेले लोकप्रतिनिधी थेट जनतेशी जोडलेले असतात; त्यांचा प्रभाव तणाव शांत करण्यासाठी पोलिसांपेक्षा अधिक प्रभावी ठरू शकतो. संवेदनशील भागात सण-उत्सव साजरे करताना दबावतंत्र वापरण्याऐवजी सर्व घटकांना विश्वासात घेऊन सुरक्षा पुरवणे हे पोलिसांचे प्राथमिक कर्तव्य आहे. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संघर्षाचा गैरफायदा समाजकंटक घेऊ शकतात; त्यामुळे वरिष्ठांनी तातडीने हस्तक्षेप करून समन्वय घडवून आणणे आवश्यक आहे. खमके पोलीस अधीक्षक म्हणून श्री. मुम्मका सुदर्शन हे टिपरसेंचे कान टोचतील अशी अपेक्षा आहे.

### गांभीर्याने विचार व्हावा

शहरातील अशांततेच्या वातावरणात लोकप्रतिनिधी व पोलीस अधिकारी यांच्या खटके उडत राहणे चांगले लक्षण नाही. पोलीस अधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली निष्पक्ष आणि लोकभावनेचा आदर करत काम करणे अपेक्षित असते. अहिल्यानगरसारख्या ऐतिहासिक आणि संवेदनशील शहरात लोकप्रतिनिधींशी विनाकारण संघर्ष ओढवून घेणे आणि एकांगी कारवाया करणे सामाजिक शांततेसाठी अजिबात हितावह नाही. कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत ठेवायची असेल, तर पोलीस प्रशासनाने याचा गांभीर्याने विचार करणे हाच एकमेव मार्ग आहे.

### विश्वासाचा अभाव आणि वाढता असंतोष

शहरातील घटनांनंतर उपाययोजना करताना स्थानिक आमदार संग्राम जगताप यांच्याशी समन्वय साधण्यात पोलीस प्रशासन कमी पडताना दिसत आहे. सामाजिक घटकांशी संवाद न साधता थेट निर्णय घेतले जात आहेत. त्यामुळे उत्सव व आंदोलनांवर गदा येत असल्याची भावना पसरत आहे.: हिंदूंचे धार्मिक उत्सव, मिरवणुका आणि जनहितासाठी निघणारे मोर्चे यांना नियमांच्या नावाखाली वारंवार विरोध केला जात असल्याचा सूर जनतेत आहे.संवाद साधून मार्ग काढण्याऐवजी मंडळांचे पदाधिकारी, उत्सव समितीचे कार्यकर्ते यांच्यावर थेट कारवाईचा बडगा उगारल्याने तरुणांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.



## सातबाऱ्यावरील नोंदीसाठी लाच मागणारी कापूरवाडीची महिला सर्कल एसीबीच्या जाळ्यात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्लॉटच्या खरेदीची नोंद संगणकीय सातबारा उताऱ्यावर घेण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागणी करणारी कापूरवाडी येथील मंडळ अधिकारी श्रीमती संगीता नारायण पुंड (वय ३७, रा. ईएमई कॉलनी, अहिल्यानगर) हिला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मंगळवारी अटक केली.

तक्रारदार (वय ५८, व्यवसाय चालक) व त्यांच्या मित्राने मौजे बुऱ्हाणनगर येथे प्लॉट खरेदी केला होता. त्याची फेरफार नोंद सातबाऱ्यावर होती, मात्र संगणकीकरणादरम्यान ती ऑनलाइन दिसत नव्हती. हा उतारा ऑनलाइन मिळवण्यासाठी त्यांनी तहसीलदारांकडे अर्ज केला होता. या अर्जाच्या चौकशीदरम्यान मंडळ अधिकारी पुंडने कामासाठी पाच हजार रुपयांची लाच मागितली. त्यावेळी तक्रारदाराने त्यांना एक हजार रुपये दिले.

उर्वरित चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी होत असल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाद मागितली. यापूर्वी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणीमध्ये पुंडने पूर्वीचे एक हजार रुपये स्वीकारल्याची कबुली देऊन उर्वरित चार हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच तहसील कार्यालयातील अन्य



एका कर्मचाऱ्याला लाच देण्यासाठी तक्रारदाराला प्रोत्साहन दिल्याचेही स्पष्ट झाले. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुंड हिला ८ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली.

### पथकात यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे, कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे, पोलीस निरीक्षक छाया देवरे व पथकातील पोलीस अंमलदार गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक आणि सुपेकर यांनी केली. लाचेची मागणी झाल्यास नागरिकांनी १०६४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीने केले आहे.

## भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली भुईकोट किल्ल्याची पाहणी

**संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांकडून घेतली मंजूर कामांच्या आराखड्याची माहिती; प्रत्यक्ष जागेवर घेतला आढावा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरालगतच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि पर्यटनाच्या दृष्टीने मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून मंजूर झालेल्या कामांच्या संपूर्ण आराखड्याची माहिती घेत, प्रत्यक्षात किल्ल्याच्या कोणत्या भागात काय होणार आहे, याचा जागेवरच आढावा घेतला.

डॉ. विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांसमवेत किल्ल्याच्या विविध भागांची पाहणी केली. प्रस्तावित कामांची रचना, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, परिसराचे नियोजन तसेच पर्यटकांच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी संबंधितांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली.

पाहणीदरम्यान आराखड्यातील कामांची प्रत्यक्ष जागेशी सांगड घालत आवश्यक त्या बाबींवर त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ज्या ठिकाणी आवश्यक बदल किंवा सुधारणा करणे गरजेचे आहे, त्याबाबतही त्यांनी संबंधितांना सूचना केल्या. ऐतिहासिक वारशाचे मूळ



स्वरूप आणि महत्त्व जपतच पुढील नियोजन करण्यात यावे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

भुईकोट किल्ल्याच्या नूतनीकरणासाठी निधी मंजूर झाल्यानंतर लष्करी प्रशासनासोबतचा सामंजस्य करार () हा महत्त्वाचा टप्पा होता. हा विषय मार्गी लागण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी , संरक्षण मंत्री राजनाथ सिंह , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या पातळीवर झालेल्या प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे पूर्ण झाला असून, आता मंजूर आराखड्यानुसार पुढील प्रक्रिया मार्गी लागली आहे. किल्ल्याशी संबंधित ऐतिहासिक वास्तू, स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती आणि महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भांचे जतन करून ते नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडण्याचे नियोजन आहे. सह सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी संबंधित ऐतिहासिक संदर्भांनाही या माध्यमातून उजाळा मिळणार आहे.

भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या इतिहासाचा आणि अस्मितेचा महत्त्वाचा ठेवा आहे. या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करत त्याला पर्यटनाच्या दृष्टीने नवी ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने मंजूर आराखड्याची प्रत्यक्ष पाहणी करून डॉ. विखे पाटील यांनी कामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## आंतरराज्यीय सायबर ठगांना उत्तर प्रदेशातून अटक

**पेट्रोलपंप डिलरशीपच्या आमिषाने ८४ लाखांची फसवणूक । नगर सायबर पोलिसांची कामगिरी**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिओ कंपनीची पेट्रोलपंप डीलरशिप व परवाना मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका नागरिकाची तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन सराईत सायबर गुन्हेगारांना अहिल्यानगर सायबर पोलिसांनी उत्तर प्रदेशातून शिताफीने ताब्यात घेतले आहे.

आकाश सिंह ऊर्फ सौरभ अग्रवाल (वय ३३) आणि नीलेश कुमार द्विवेदी (वय २९, दोघे रा. हमीरपूर, उत्तर प्रदेश) अशी ■ पान ४ वर

### यांनी लावला छडा

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर ढिकले, उपनिरीक्षक सुदाम काकडे, अंमलदार उमेश खेडकर, रावसाहेब हुसळे, शैलेश गोमसाळे, रवींद्र कर्डिले, प्रशांत जाधव, आप्पा हिंगे आणि प्रशांत राठोड यांच्या पथकाने पार पाडली.

## भगवानबाबा मल्टीस्टेट फसवणूक प्रकरण, चार गुन्ह्यांतील फरार आरोपीला बेड्या

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मुदत ठेवी व विविध योजनांवर भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवून ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या श्रीसंत भगवानबाबा मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटीच्या फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. दिनेश शिवनाथ वैद्य (वय ४८, रा. बालमटाकळी, ता. शेवगाव) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे मुख्य कार्यालय असलेल्या या संस्थेच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक व व्यवस्थापकांनी ठेवीदारांना जादा व्याजाचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी जमा करून घेतल्या. मुदत संपल्यानंतरही ठेवी परत न करता अपहार केल्याप्रकरणी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर श्रीरामपूर शहर, शेवगाव, पाथर्डी व कोतवाली पोलीस ठाण्यांत फसवणूक आणि एमपीआयडी कायद्यान्वये एकूण ४ गुन्हे दाखल आहेत.

गुन्हे दाखल झाल्यापासून आरोपी फरार होते. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करत असून, एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक नेमले होते. ■ पान ४ वर

## व्याजाचा दट्ट्या लावून जमीन हडपणारे दोन सावकार जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तारण ठेवलेल्या जमिनीपोटी कोट्यवधी रुपयांची परतफेड केल्यानंतरही अधिक पैशांचा दट्ट्या लावून जमीन हडपणाऱ्या दोन अवैध सावकारांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. सुरेश मोतीलाल कांकरिया (वय ६४, रा. विराज कॉलनी, तारकपूर) आणि विनय गुरूलिंग होनराव (वय ५५, रा. डावरे गल्ली, नगर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. फिर्यादी दत्तात्रय जगन्नाथ आगरकर (वय ७७, रा. आगरकर मळा) यांनी २०१६ पासून जमीन तारण ठेवून आरोपी सुरेश कांकरिया याच्याकडून २ कोटी रुपये व्याजाने घेतले होते. फिर्यादीने मुद्दल व व्याजापोटी तब्बल ३ कोटी ७५ लाख रुपये परत केले. तरीही आरोपींनी तारण ठेवलेली जमीन परत न करता, चक्रवाढ पद्धतीने तब्बल १८ कोटी ३८ लाख १४ हजार ६९५ रुपयांची अवाजवी मागणी करत फिर्यादीला धमकावून मानसिक त्रास दिला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### आनंदधाम येथे २०२७ मध्ये पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांचा चातुर्मास



अहिल्यानगर- राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांची तपोभूमी असलेल्या अहिल्यानगरमध्ये पुढील वर्षी २०२७ मध्ये प.पू. गणेशलालजी म.सा., प.पू. मिश्रीलालजी म.सा., प.पू. प्रभाकंवरजी म.सा. यांच्या अनुयायी जिनशासन प्रभाविका पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. आदी ठाणा ४ यांचा आनंदधाम येथे चातुर्मास होणार आहे. महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांच्या आज्ञेने व श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, अहिल्यानगर यांच्या विनंतीवरून पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांनी चातुर्मासासाठी तात्विक मान्यता दिली आहे. पूज्य श्रुतमुनीजी म.सा. पुढील महिन्यात मद्रास येथून या चातुर्मासाची अधिकृत घोषणा करतील, अशी माहिती जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमलजी मुनोत व सेक्रेटरी संतोष बोथरा यांनी दिली. पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांच्या समवेत मधुर गायिका पूज्य जिज्ञासाश्रीजी म.सा., अध्ययनशील पूज्य सुबोधीजी म.सा., ज्ञान पिपासू पूज्य निर्मितीप्रभाजी म.सा. असतील. पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांचा २०२६ चा चातुर्मास सध्या छत्रपती संभाजीनगर येथे सुरू आहे. नगरमधील श्रावक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांच्या आज्ञेने छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांना नगरमधील चातुर्मासासाठी विनंती केली. आनंदधाम येथे हा चातुर्मास होणार आहे. गुरूवर्यांच्या पावन सान्निध्याचा आणि अनमोल मार्गदर्शनाचा लाभ नगरमधील भाविकांना पुढील वर्षी चातुर्मासात मिळणार आहे. या चातुर्मासाच्या घोषणेने नगर संघात आनंदी वातावरण तयार झाले आहे, असे श्रावक संघाचे सहसेक्रेटरी संतोष गांधी, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत व सतीश लोढा यांनी सांगितले.

### शिक्षक म्हणजे भावी पिढीच्या संस्कारांचा आधारवड! - पांडुळे



अहिल्यानगर - शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त शाळेतील शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांच्या हस्ते शालेय शिक्षकांचा गौरव करण्यात आला. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमास माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक महादेव भद्रे यांच्यासह मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, सोनाली अनभुल, रूपाली वाबळे, कांचन मदने, भारती सुसरे, भाग्यश्री लोंढे, कविता हिरणवळे, इंदुमती दरेकर, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे, सौ. जगताप, बिडवे आदींसह शालेय शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, शिक्षक हा भावी पिढीमध्ये संस्कार आणि सामाजिक मूल्ये जिवंत ठेवणारा प्रवाह आहे. शिक्षक मुलांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता, आत्मविश्वास, विवेक आणि चिकित्सकता निर्माण करून समाज घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. चार भिंतींच्या आत केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरती शिक्षकांची भूमिका मर्यादित नसते. विद्यार्थ्यांना जगात भरारी घेण्यासाठी त्यांच्या पंखांत ज्ञानरूपी बळ देण्याचे काम शिक्षक करीत असतात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर म्हणाल्या की, शिक्षक भारताचे उज्ज्वल भवितव्य घडवित आहे. शिक्षक हा समाजाचा आधारवड असून, विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे काम शिक्षक करीत असतात. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती आदर आणि निष्ठा कायम ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनी दिलेले ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारे असते.

# कुंभमेळ्याच्या निमित्ताने शिर्डीसाठी भरीव निधी मिळावा; नगरसेवक अमित शेळके यांची मागणी

**नगरसेवक शेळकेंनी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांचे शिर्डीच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**शिर्डी –** शिर्डी नगरपरिषदमध्ये प्रथमच शिर्डीतील सर्व शाळांतील गुरुजनांचा शिक्षक दिनानिमित्त सत्कार आयोजित करण्यात आला होता तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा देखील यानिमित्ताने सत्कार व संवाद कार्यक्रम ना राधाकृष्ण विखे पाटील, डॉ सुजय विखे पाटील यांच्या सूचनेनुसार व नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात नगरसेवक अमित शेळके यांनी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या कडे शिर्डीतील विविध विकासकामांना लागणाऱ्या निधीबाबत मागणी करत नगर मनमाड महामार्गाचा शिर्डीतून जाणारा तीन किलोमिटर रस्ता शिर्डी नगरपरिषदेकडे वर्ग करण्याबाबत पाठपुरावा करून सदर रस्ता शिर्डी नगरपरिषद,श्री साईबाबा संस्थानच्या वतीने विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली तसेच कुंभमेळा तोंडावर आला असून जवळपास साडे आठ हजार कोटींच्या मंजूर झालेल्या कामांमधून कुंभमेळ्याच्या आधी ही मंजूर कामे पूर्ण व्हावीत तसेच शिर्डी साठी या माध्यमातून काय विकासकामे करता येईल याकडे लक्ष घालावे,कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर सारख्या तीर्थक्षेत्री ६००-७०० कोटींचा निधी मंजूर होतो मात्र शिर्डीला अजून एक रुपया सुद्धा भेटलेला नसल्याची खंत व्यक्त करत भीमाशंकर सारखा भरीव निधी शिर्डीला मिळावा यासाठी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी प्रयत्न करण्याची विनंती नगरसेवक अमित शेळके यांनी केली

त्याचप्रमाणे शिर्डी नगरपरिषद वर्षाला ११ कोटी रुपये कराच्या माध्यमातून शासनाला भरत असल्याने कुंभमेळ्याचे पैसे संस्थानच्या तिजोरीतून न जाता शासनाकडून मिळावे यासाठी प्रयत्न करावा व तसेच शहरात १० ते १५ हायमॅक्स ची गरज असल्याचे सांगत तेसुद्धा उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेवक अमित शेळके यांनी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याकडे केली यावर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत नगरसेवक अमित शेळके यांनी मांडलेल्या सूचनांचा विचार करून त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित केले.

**आनंद तीर्थ समवशरण येथे गुरूभक्तांच्या मास खमणचे पच्चक्खाण**

# श्रद्धा असल्यावर तपस्येसाठी ऊर्जा मिळते : पूज्य प्रविणऋषीजी महाराज

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात जैन धर्मियांचा पवित्र समर्पण चातुर्मास २०२६ सुरू आहे. उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रविणऋषीजी म.सा. यांच्या या चातुर्मासात भाविक मोठ्या श्रद्धेने जप, तप, आराधना, तपस्या करत आहेत. चातुर्मासानिमित्त ४ गुरूभक्तांनी मास खमण (३१ उपवास) केले. त्याचे पच्चक्खाण आनंद तीर्थ समवशरण येथे शनिवारी झाले.

अहिल्यानगर येथील ललित गुगळे, सौ.शिल्पा नहार, राहुरी येथील सौ.भारती सुराणा आणि कु. खुशी चोरडिया यांनी गुरूदेवांच्या आशीर्वादाने ३१ दिवसांचे कडक उपवास (मास खमण) करून आत्मशुद्धीच्या मार्गावर प्रवास केला. या मास खमणचे पच्चक्खाण (प्रत्याख्यान) शनिवारी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात झाले. यावेळी वैदेही जैन यांचा संगीत भक्ती कार्यक्रम झाला.

तपस्वींचा समर्पण चातुर्मास कमिटीच्या वतीने मानपत्र, शाल व माळा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्य तसेच तपस्वींच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी महाराज म्हणाले की, धर्माच्या रस्त्याने चालणाऱ्या व्यक्तींसाठी मार्ग प्रशस्त करणे, त्याला पाठबळ देण्याला संघ म्हणतात. संघात प्रथम तपस्वी, चारित्र्यसंपन्न, संस्कारींचा आश्रव झाला पाहिजे. श्रद्धाळूंचे संघटन म्हणजे संघ. संघात सुरक्षिततेचा संवरही झाला पाहिजे. तपस्येची सुरूवात अट्ठाईने झाली की मास खमण होऊ शकते. तशी ऊर्जा मिळते. यासाठी श्रद्धा हवी. चारही तपस्वींनी अतिशय श्रद्धेने मास खमण केले आहे.

# आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये शाडू मातीचे गणपती बनवा कार्यशाळा उत्साहात




दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका आणि द आयकॉन पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा अभियान ७.०' अंतर्गत आयकॉन पब्लिक स्कूल येथे शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि निसर्गाचे संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

स्वागतपर मनोगतात प्राचार्या दीपिका नगरवाला यांनी सांगितले की, शिक्षक दिन सारखा दिवस या कार्यशाळेसाठी अत्यंत समर्पक आहे. आपल्या संस्कृती व परंपरांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्या परंपरा साजऱ्या करताना पर्यावरण आणि निसर्गसंवर्धनाचा विचार करणेही गरजेचे आहे. संस्कृतीची मुळे जपत पर्यावरणाचे संरक्षण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या स्कूल कॉयरच्या गणेश वंदनेने झाली. आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनमोहक शास्त्रीय नृत्याने आणि बासरी वादनाने उपस्थितांची मने जिंकली. महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, महापौर ज्योतीताई गाडे यांनी विद्यार्थी व शिक्षकांना पर्यावरणाविषयी जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण करण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी असून, विद्यार्थ्यांनी स्वतः पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सहभागी होतानाच आपल्या कुटुंबात आणि समाजातही पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचवावा, असे त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेत सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रसिद्ध मूर्तिकार बालाजी वल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून आकर्षक गणेश मूर्ती साकारल्या. स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करण्याचा आनंद घेत असतानाच विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव, जलप्रदूषण टाळणे आणि निसर्गाचे संरक्षण याबाबत महत्त्वपूर्ण संदेश आत्मसात केला.

# डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये नेत्रदान जनजागृती कार्यक्रम

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नेत्रदानाचे महत्त्व समाजातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, नेत्रदानासंदर्भातील गैरसमज दूर करणे तसेच कॉर्निया व नेत्रदान प्रक्रियेबाबत शास्त्रीय माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील नेत्ररोग विभागाच्या वतीने नेत्रदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नेत्रदानाचे वैद्यकीय, सामाजिक व मानवी महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये नेत्ररोग विभागासोबतच नेत्रपेढी देखील कार्यरत असून, नेत्रदानाच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या कॉर्नियाचा गरजू रुग्णांना दृष्टी पुनर्स्थापनेसाठी उपयोग होऊ शकतो. त्यामुळे नेत्रदानाबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करणे आणि अधिकाधिक नागरिकांना नेत्रदानासाठी प्रोत्साहित करणे, हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश होता. कार्यक्रमामध्ये नेत्ररोग विभागातील डॉक्टरांनी नेत्रदानाचे महत्त्व, कॉर्नियाचे कार्य, कॉर्नियाशी संबंधित विविध आजार, कॉर्नियाच्या आजारांमुळे होणारे दृष्टीदोष तसेच नेत्रदानानंतर त्याचा वैद्यकीय पद्धतीने होणारा उपयोग याबाबत सविस्तर माहिती दिली. कॉर्निया हा डोळ्याच्या पुढील बाजूस असलेला पारदर्शक भाग असून, त्यामध्ये निर्माण होणाऱ्या विविध विकारांमुळे व्यक्तीच्या दृष्टीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत योग्य रुग्णांसाठी उपलब्ध होणाऱ्या दान केलेल्या कॉर्नियामुळे दृष्टी पुनर्स्थापित करण्यास मदत होऊ शकते, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

नेत्रदान कोण करू शकते, नेत्रदानासाठी कोणत्या बाबी महत्त्वाच्या असतात, मृत्यूनंतर नेत्रदानाची प्रक्रिया कशा पद्धतीने केली जाते, नेत्रदानासाठी कुटुंबीयांची भूमिका काय असते तसेच नेत्रदानासंदर्भात समाजात असलेले गैरसमज कोणते आहेत, याबाबतही डॉक्टरांनी माहिती दिली. नेत्रदान ही वैद्यकीयदृष्ट्या नियोजित प्रक्रिया असून, त्याबाबत नागरिकांनी योग्य माहिती जाणून घेणे आवश्यक आहे, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

नेत्ररोग विभागाच्या विभागप्रमुख डॉ. अरुंधती पांडे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित केले. समाजामध्ये नेत्रदानासंदर्भात अनेक गैरसमज आढळून येतात. हे गैरसमज दूर करण्यासाठी सातत्याने जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मृत्यूनंतर केलेल्या नेत्रदानातून एखाद्या दृष्टीहीन व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश आणण्याची संधी मिळते. त्यामुळे नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करून या सामाजिक कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. सुवर्णा कल्पड आणि डॉ. आकांक्षा पंडित यांनीही उपस्थितांना नेत्रदानासंदर्भात मार्गदर्शन केले. नेत्रदानाची प्रक्रिया, कॉर्नियाचे महत्त्व तसेच नेत्रदानाबाबत नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी माहिती दिली. नेत्रदानाविषयी योग्य माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे गरजेचे असून, कुटुंबातील व्यक्तींनी नेत्रदानाबाबत परस्परांशी संवाद साधून जागरूकता निर्माण करावी, असे यावेळी सांगण्यात आले. नेत्रदान हे केवळ वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक असलेले दान नसून, ते सामाजिक बांधिलकी आणि मानवी संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या नेत्रदानामुळे दुसऱ्या व्यक्तीला दृष्टी मिळण्याची शक्यता निर्माण होते. दृष्टी प्राप्त झाल्यामुळे दृष्टीहीन व्यक्तीच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि सामाजिक जीवनाला नव्याने दिशा मिळू शकते. त्यामुळे नेत्रदानाच्या माध्यमातून मृत्यूनंतरही समाजासाठी योगदान देण्याची संधी नागरिकांना मिळते, याबाबत कार्यक्रमातून जनजागृती करण्यात आली. हा जनजागृती कार्यक्रम डॉ. सुजयदादा विखे पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी - डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, अहिल्यानगर) यांच्या प्रेरणेतून आणि डॉ. अभिजीत दिवटे (डायरेक्टर मेडिकल) तसेच डॉ. अरुण त्यागी (डायरेक्टर क्लिनिकल) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सतीश मोरे (वैद्यकीय अधीक्षक) यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच हॉस्पिटलमधील सर्व प्रशासकीय अधिकारी आणि संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले. डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये रुग्णांना अत्याधुनिक व दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच नेत्रदान आणि कॉर्नियाशी संबंधित सेवांसाठी नेत्रपेढीच्या माध्यमातून कार्य केले जात आहे. या सुविधेमुळे नेत्रदानाबाबत जनजागृती करण्यास तसेच गरजू रुग्णांना आवश्यक त्या वैद्यकीय सेवेपर्यंत पोहोचविण्यास महत्त्वपूर्ण मदत होत आहे. त्यामुळे नागरिकांनी नेत्रपेढीच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या सेवांची माहिती घेऊन नेत्रदान चळवळीस सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. नेत्रदानाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढविणे, वैज्ञानिक दृष्टिकोनातून नेत्रदानाची माहिती समाजापर्यंत पोहोचविणे आणि दृष्टीहीन व्यक्तींना दृष्टी मिळवून देण्यासाठी सामाजिक सहभाग वाढविणे, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला महत्त्व प्राप्त झाले. नेत्रदानासंदर्भातील गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, तसेच आपल्या कुटुंबीयांमध्ये आणि समाजामध्ये नेत्रदानाचे महत्त्व सांगावे, असे आवाहन कार्यक्रमातून करण्यात आले.

# जुनी पेन्शनच्या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, अहिल्यानगर महानगरचा पाठिंबा

**शाळा-शाळांमध्ये जाऊन जनजागृती, काळ्या फितींचे वाटप**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या वतीने विविध आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, अहिल्यानगर महानगर यांच्यावतीने सक्रिय पाठिंबा देण्यात आला.

या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, शहर जिल्हाध्यक्ष प्रसाद सामलेटी, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक सुरज घाटविसावे,कोषाध्यक्ष शुभम टेमकर,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अनिता सरोदे तसेच किरण डहाणे,साजिद पठाण, कराळे सर,सुम्बरे सर, अशोक डोळसे,जयश्री घोडे,दीपक शिंदे, सुनील कुलकर्णी,अजय महाजन,वर्षा गुंडू, धारणगावकर मॅडम, सुजय रामदासी, बलराम डोमल यांच्यासह सर्व शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगर शहरातील विविध शाळांना भेटी देऊन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी काळ्या फिती लावून शालेय कामकाज करण्याच्या आंदोलनास पाठिंबा दर्शविण्यासाठी काळ्या फितींचे वाटप करण्यात आले.

जुनी पेन्शन हा हक्काचा प्रश्न - प्रसाद सामलेटी

जुनी पेन्शन हा केवळ निवृत्तीनंतर मिळणाऱ्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न नसून, आयुष्यभर प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या हक्काचा व कुटुंबाच्या भविष्याचा प्रश्न आहे. त्यामुळे शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका यावेळी शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष प्रसाद सामलेटी यांनी व्यक्त केली.

# गुरुजनांचा गौरव अन् गोविंदाचा उत्साह; वि. ल. कुलकर्णी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा, पूर्व प्राथमिक वर्ग आणि प्रगत माध्य.व उच्च माध्य. विद्यालयात दहीहंडी कार्यक्रम व ५ सप्टेंबर शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने सुरू झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी संस्थेच्या सर्व विभागांच्या सर्व शिक्षकांचा तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. धिमते विजया श्रीम . धरम प्रतिभा व श्रीम. खडके विद्या यांचा आदरयुक्त सन्मान करण्यात आला. त्याआधी दहीहंडी कार्यक्रमाने वातावरण चैतन्यमय झाले होते.मानवी मनोरे रचत सर्व विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. हा मान मात्र इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी पटकावला. गोविंदा आला रे आला च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना सचिव श्री किरण वैकर यांनी गुरु असता पाठीराखा इतरांचा लेखा कोण करी अशा शब्दात अनेक गोष्टींचा त्याग करून जबाबदार नागरिक , अधिकारी , संशोधक घडवणाऱ्या शिक्षकांप्रती आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खजिनदार श्री.उमेश रेखे यांनी केले.आयुष्याला आधार, आकार आणि अमर्याद आकाश देणाऱ्या शिक्षकांविषयी कार्यशाळेसाठी शाळेत आलेल्या बीएड कॉलेजच्या शिक्षक विद्यार्थी श्री.साबळे यांनीही आपले मत व्यक्त केले. अशा आनंदाने व उत्साहाने ओतप्रोत भरलेल्या या कार्यक्रमात संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी श्रीम. विजया रेखे, श्री. महेशजी रेखे श्री.उदयकुमार भगणे श्री.विठ्ठल धिमते , श्री. हेमंत जोशी,ॲड श्री. उमेश नगरकर मुख्याध्यापिका सौ.भारदे , प्राचार्य श्री. सुनिल पंडीत , सौ. भाळवणकर सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### योगी गेंडानाथजी महाराज स्मरणार्थ भक्तीगीत गायन स्पर्धा संपन्न



अहिल्यानगर - कलाक्षेत्रात प्राविण्य प्राप्त करण्यासाठी प्रचंड जिद्द आणि अथक मेहनत असावी लागते. स्वतःला झोकून देत कलासाधना केल्यास यशाचे अत्युच्च शिखर गाठणे शक्य होऊ शकते. असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगर पालिकेच्या महापौर सौ. ज्योती अमोल गाडे यांनी केले. स्वरबहार फाऊंडेशन आयोजित शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे पुजारी योगी गेंडानाथजी महाराज यांच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. स्पर्धेत एकूण चोपन्न स्पर्धकांनी सहभाग घेतला. परीक्षक म्हणून श्री जगदीश वेदपाठक ( छत्रपती संभाजीनगर ) व संपदा चौधरी यांनी काम पाहिले. साथसंगत हार्मोनियम प्रणव देशपांडे, तबला हर्षद भावे, अजित गुंदेचा, टाळ अच्युत घबाडे यांनी केली. यावेळी सुफी गायक श्री. पवन नाईक, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त श्री. चंद्रकांत फुलारी, श्री. ज्ञानेश्वर रासकर यांची उपस्थिती होती. स्पर्धा संयोजक राजेंद्र टाक यांच्या मातोश्रींचे याच दिवशी पहाटे निधन होऊनही स्पर्धा पुढे न ढकलता ठरलेल्याच वेळी घेण्यात आल्या. ही माहिती समजताच स्पर्धक, त्यांचे पालक, शिक्षक सर्वांनीच या निर्णयाचे कौतुक करून हळहळ व्यक्त केली. प्रारंभीच स्व. कौशल्याबाई टाक यांना श्रद्धांजली अर्पण करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. आमदार संग्राम भैय्या जगताप यांनी कार्यक्रम स्थळी दिलेल्या भेटीदरम्यान निधनाचे वृत्त कळताच श्री टाक यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांचे आणि कुटुंबीयांचे सांत्वन केले.

### जन्म-मृत्यूही आता डिजिटल कोट्याची वाट पाहणार का?

अहिल्यानगर- जन्म आणि मृत्यू ही प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची नोंद असून, त्याचे प्रमाणपत्र आज शिक्षण, पासपोर्ट, व्हिसा, परदेशातील प्रवेश, वारसा, विमा यांसह विविध शासकीय प्रक्रियांसाठी आवश्यक झाले आहे. केंद्र सरकारने ()च्या माध्यमातून जन्म-मृत्यू नोंदणीची प्रक्रिया डिजिटल केली असली, तरी या व्यवस्थेच्या अंमलबजावणीतील तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याची वस्तुस्थिती सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे मांडली आहे. डिजिटल व्यवस्था नागरिकांची कामे सुलभ करण्यासाठी असताना, प्रत्यक्षात नागरिकांना कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत असतील, तर या व्यवस्थेचा गांभीर्याने आढावा घेण्याची गरज असल्याचे वधवा यांनी म्हटले आहे. वधवा यांनी आपल्या प्रसिद्धीपत्रकात तीन प्रकरणांचा दाखला दिला आहे. त्यांच्या एका जवळच्या सहकाऱ्याचा पुण्यातील रुग्णालयात मृत्यू झाला. रुग्णालयात दाखल करताना अहिल्यानगर येथील नोंदीतील नाव चुकीचे असल्याने त्याच चुकीच्या नावाने पुणे महानगरपालिकेकडे मृत्यूची नोंद पाठविण्यात आली. त्यामुळे मृत्यू प्रमाणपत्रावरही नाव चुकीचे आले.नाव दुरुस्तीसाठी कुटुंबीयांनी पाठपुरावा केला. रुग्णालयाचे पत्र सादर करण्यास सांगण्यात आले. आधारकार्डनुसार रुग्णालयाने नवीन पत्र दिल्यानंतरही प्रक्रिया तातडीने पूर्ण झाली नाही. अखेर साध्या नावाच्या दुरुस्तीसाठी तब्बल चार महिने लागल्याचे वधवा यांनी नमूद केले आहे. दुसऱ्या प्रकरणात शहरातील एका नामांकित डॉक्टरांना पोर्तुगाल/शेंगेन व्हिसासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता होती. त्यांचे १९७४ सालचे मूळ जन्म प्रमाणपत्र मराठी भाषेत होते. नवीन द्विभाषिक प्रमाणपत्र तयार करताना आडनावत चूक झाली होती. ही चूक दुरुस्त करण्यासाठी सुमारे एक ते दीड महिना लागला. या विलंबामुळे व्हिसा मुलाखतीची तारीख निघून गेली आणि परिषदेसाठीच्या प्रवासाचे नियोजन, शुल्क व इतर व्यवस्थांवर परिणाम झाला. परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अशा प्रमाणपत्रातील एका अक्षराची चूकही गंभीर ठरू शकते, असे वधवा यांनी म्हटले आहे.

## नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून नगरपरिषदमधे प्रथमच गुरुजनांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा शिर्डी नगरपरिषदेच्या वतीने सत्कार व नुकत्याच झालेल्या शिक्षक दिनानिमित्त आज शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा नगरपरिषदेत यथोचित सत्कार करण्यात आला तसेच शिर्डीतील सर्व शाळांतील सन्माननीय मुख्याध्यापक व गुरुजनांचा खासदार भाऊसाहेब वाकचौरे, नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल व सन्मानपत्र देत सत्कार करण्यात आला.

यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात यांच्या सह नगरसेवक नगरसेविका यांचे आभार मानत हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आल्या बद्दल कौतुक केले..यावेळी खासदार वाकचौरे म्हणाले की शिर्डी नगरपरिषदेच्या २६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच शिक्षकांचा सत्कार करण्यात आला ही अतिशय अभिमानाची बाब असून या कार्यक्रमासाठी मला देखील उपस्थित राहता आले हे माझं भाग्य आहे तसेच शिर्डी नगरपरिषदेत देखील मला प्रथमच येण्याचा योग आला आणि माझा सत्कार केला त्याबद्दल नगराध्यक्षा,सर्व नगरसेवक नगरसेविका यांचे त्यांनी आभार मानले व आपल्या भाषणात मार्मिक टोलेबाजी करत उपस्थित नगरसेवकांनी मांडलेल्या सूचनांचा नक्कीच राज्यस्तरावर आणि केंद्र स्तरावर प्राधान्याने पाठपुरावा करू असे आश्वासित केले

याप्रसंगी शिक्षकांनी देखील नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ थोरात यांच्यासह नगरसेवकांचे ह्या स्तुत्य उपक्रमाबद्दल आभार मानत समाधान व्यक्त केले. यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात, गंगाभाऊ कोते,शिवसेना जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, नगरसेविका सौ छायाताई पोपट शिंदे, सौ वैशाली दत्तात्रय कोते,सौ छायाताई सुधीर शिंदे, सौ रेखाताई रानमाळे,नगरसेवक रवींद्र गोंदकर,निलेश कोते, अमित शेळके, सचिन गायकवाड,दीपक गोंदकर,बापू ठाकरे,अबरार शेख, अशोक पवार यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## विषमुक्त शेतीसह आरोग्यासाठी रानभाज्यांचा आहारात वापर वाढवावा

### धान्य महोत्सवाच्या धर्तीवर रानभाजी महोत्सव घेण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे बऱ्हाटे यांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. कमी जोखमीची, पर्यावरणपूरक आणि विषमुक्त शेती करून जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण एक टक्क्यापेक्षा अधिक वाढविण्यासाठी नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर पारंपरिक पद्धतीने उपलब्ध होणाऱ्या रानभाज्यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या संवर्धनासाठी शासनस्तरावर व्यापक प्रयत्न होणे आवश्यक आहे असे मत सेवानिवृत्त जिल्हाअधीक्षक कृषीअधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी व्यक्त केले.

कर्टुले ही पारंपरिक रानभाजी असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अन्नघटक उपलब्ध असतात. ही रानभाजी प्रामुख्याने खरीप हंगामात उपलब्ध होते. बांधावर नैसर्गिकरीत्या येणाऱ्या रानभाज्यांमध्ये कोणत्याही प्रकारची रासायनिक खते किंवा रासायनिक फवारणी नसल्याने त्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. हंगामानुसार उपलब्ध होणाऱ्या या भाज्यांमधून शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे व पोषक घटक मिळतात. मात्र, बदलत्या जीवनशैलीमुळे रानभाज्यांचा आहारातील वापर दिवसेंदिवस कमी होत असल्याची खंतही बऱ्हाटे यांनी व्यक्त केली.नैसर्गिक शेतीमध्ये पारंपरिक भाजीपाला लागवडीसोबतच बायोगॅस प्रकल्प आणि देशी गाईपासून



जीवामृत तयार करून त्याचा शेतीत वापर केल्यास रासायनिक खतांना टप्प्याटप्प्याने पर्याय निर्माण करता येऊ शकतो.

परिणामी रासायनिक खते व पीक संरक्षणावरील खर्च कमी होण्यास मदत होऊ शकते, असे अनेक शेतकऱ्यांचे अनुभव असल्याचे सांगत.धकाधकीच्या जीवनशैलीमुळे मानवी आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. रासायनिक फवारणी केलेल्या भाजीपाल्याचा वापर वाढत असताना नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणाऱ्या रानभाज्यांचा आहारात समावेश वाढविणे गरजेचे आहे. आरोग्यसंपन्न जीवनासाठी पारंपरिक रानभाज्यांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत रेसिडेन्शिअल हायस्कूल जिल्ह्यात अव्वल!

### शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा भक्कम पाया– जी. डी. खानदेशे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर रेसिडेन्शिअल हायस्कूलने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात अव्वल कामगिरी करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता पाचवी, सातवी व आठवीतील तब्बल ७२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून, या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. जी. डी. खानदेशे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य श्री. जाधव व्ही. व्ही. यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागील मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेचे प्रोत्साहन यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. जी. डी. खानदेशे यांनी, "शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा भक्कम पाया आहे," असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करून सातत्य, मेहनत आणि अभ्यासाचे योग्य नियोजन अंगीकारावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष श्री. रा. ह. दरे यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. सीताराम पाटील खिलारी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पर्धा परीक्षांचे जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करावीत, असे त्यांनी सांगितले. संस्थेचे सहसचिव श्री मुकेश दादा मुळे तसेच संस्थेच्या खजिनदार दीप लक्ष्मी म्हसे मॅडम, विश्वस्त श्री जयंत वाघ साहेब या प्रसंगी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते ७२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेने आणि शिक्षकांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी दिलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच भविष्यातही मेहनत व सातत्याच्या जोरावर उत्तुंग यश मिळविण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास शाळेचे उपमुख्याध्यापक श्री. पवार बी. एम., पर्यवेक्षक श्री. म्हस्के डी. सी. सर, श्री. सोनवणे एस. जी. सर तसेच सौ. मरकड व्ही. के. मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दरे एस. बी. व श्री. गावडे आर. आर. यांनी प्रभावीपणे केले,

## तप साधनेमुळे पापातून मुक्तता मिळते : पूज्य प्रविणऋषीजी महाराज

### आनंद तीर्थ समवशरण येथे पर्युषण पर्व महामंगलकारी अनुष्ठानास उत्साहात प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन भूमीत त्यांचे सुशिष्य अर्हम विज्जा प्रणेता, उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २०२६ अतिशय भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे. मंगळवारी आनंद तीर्थ समवशरण येथे जैन धर्मातील पवित्र पावन पर्युषण पर्व महामंगलकारी अनुष्ठान सुरू झाले आहे. पर्युषण काळात नित्य प्रवचन, कल्पसूत्र वाचन, प्रतिक्रमण, जप, आराधना , व्रत नाटिका असे विविध कार्यक्रम होत आहेत. या पर्वानिमित्त अतिशय उत्साही वातावरणात तयार झाले आहे.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा. , पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात पयुर्षण पर्व अनुष्ठानास प्रारंभ झाला. याप्रसंगी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सदस्यांसह श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. पांढऱ्या शुभ्र रंगाच्या वेशभूषेमुळे परिसरात धवल ऊर्जेची अनुभूती आली. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती व अहिल्यानगरचे सुपुत्र



आणि तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. प्रारंभी पूज्य तिर्थेशऋषीजी महाराज यांनी पर्युषण पर्व उत्सवावर आधारित सुमधुर गीत सादर केले. पर्युषण पर्वानिमित्त महाराष्ट्र तसेच देशभरातील भाविक तप साधनेसाठी नगरला आले आहेत.

उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ज्यावेळी भूक लागली तरीही तुम्ही आहार घेत नाही तेव्हा तप होते. जेव्हा तप होते तेव्हा कर्म क्षय होतो. जुने पाप नष्ट होतात. आठ कर्मांची निर्जरा होते. यासाठीच जैन धर्मात तप साधनेला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. नकळत तप होते तेंव्हाही देवगती प्राप्त होते. समजून घेऊन तप केले तर मोक्षप्राप्ती होते. यासाठी पर्युषण काळात बियासणा तप केलेच पाहिजे. कारण हा उत्सव आत्मशुद्धीचा आहे. परमात्म्याशी बांधिलकी जपण्याचा आहे. पूज्य आलोकऋषीजी म.सा. म्हणाले की, सर्व पर्वात पर्युषण पर्व सर्वात महत्वाचे आहे.

## बहुगुणी तुळशीला मानाचे स्थान – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

### श्रावणी सोमवार निमित्त तुळस रोपांचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बहुगुणी तुळशीला अध्यात्मात मानाचे स्थान आहे. याचबरोबर तुळशीमध्ये असलेल्या विविध गुणधर्मामुळे आयुर्वेदातही विशेष महत्त्व आहे. असे प्रतिपादन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केले.

चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त येथील हरिभूमी प्रतिष्ठानच्यावतीने तोफखाना परिसरातील प्राचीन श्री सिद्धेश्वर मंदीरात तुळस रोपांचे वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते. श्री सिध्देश्वर मंदीर हे प्राचीन असून हे भाविकांचे श्रद्धा स्थान आहे.

तुळशीचे महत्त्व विशद करताना हरीभुमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी यांनी सांगितले की, तुळस ही श्रीकृष्ण भगवान यांना अतिशय प्रिय असल्याने तुळशीला कृष्णप्रिया असेही संबोधले जाते. तुळस ही मांगल्याचे व पवित्रतेचे प्रतिक असल्याने तिची नित्य नियमाने पुजा केली जाते. वारकरी संप्रदायात देखील तुळशीला मानाचे स्थान आहे.


कोरोना महामारीच्या काळात देखील रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी तुळशीच्या पानांचे सेवन केले जात होते.

दररोज तुळशीचे पाने सकाळी खाल्ल्याने मधुमेह, रक्त विकार, वात, पित्त इतर आजार नाहीसे होतात. तुळशीच्या मोहोराला मंजिरी म्हणतात. मंजिरी पाण्यात टाकून ते पाणी पिल्यास पोटाचे विकार, उष्णतादाह कमी होतो. तुळस ही सतत ऑक्सिजन देणारी वनस्पती असल्याने हवा शुद्ध करण्यासाठी व प्रदूषण रोखण्यासाठी उपयुक्त आहे

## पाचोडमध्ये घराचे कुलूप तोडून चोरी; शिवाजीनगर फाजलपुरा भागात खळबळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पाचोड येथील शिवाजीनगर– फाजलपुरा भागात राहत्या घराचे कुलूप तोडून चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत चोरी केली. या घटनेमुळे



परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून तपास सुरू केला. चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा तपशील व चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

## भास्कर कुलकर्णी यांची 'राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक व शाळा पुरस्कार २०२६' साठी निवड

### उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची दखल; 'मराठवाडा रत्न आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कारानेही होणार गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर, पैठणचे मुख्याध्यापक भास्कर रामराव कुलकर्णी यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सेवाभावी कार्याची दखल घेत , पुणे यांच्या वतीने दिला जाणारा 'राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक व शाळा पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे वेदमंगल प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित 'मराठवाडा रत्न आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' यासाठीही त्यांची निवड झाली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याला एकाच वेळी दोन प्रतिष्ठित पुरस्कारांची सलामी मिळाली आहे.

मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अंमलबजावणी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे.

'विद्यार्थी केंद्रस्थानी आणि गुणवत्ता हेच ध्येय' या विचारातून त्यांनी शाळेच्या विकासाला नवी दिशा दिली. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, नेतृत्वगुण, क्रीडा, कला, विज्ञान, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.



मुख्याध्यापक म्हणून केवळ प्रशासकीय जबाबदारी न निभावता शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यात समन्वय साधत शाळेला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारे नेतृत्व म्हणून भास्कर कुलकर्णी यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि सेवाभावी कार्याची पावती म्हणून दोन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी झालेली निवड ही आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिरसह संपूर्ण पैठणसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या निवडीबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, उपाध्यक्ष श्रीमती ज्योती ठाकूर, विद्यासभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, संकुलाचे पालक उमेश जगताप, स्थानिक व्यवस्था समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमारजी कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, प्राथमिक शाळा समितीचे अध्यक्ष शिवाजी मारवाडी, माध्यमिक शाळा समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मालाणी, तसेच विजय चाटुपळे, डॉ. राम लोंढे, मनोज शुक्ल, किशोर भाकरे, विजय पापडीवाल, दत्तात्रय पोहेकर, रविंद्र साळजोशी, मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती जोशी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

भास्कर कुलकर्णी यांच्या या दुहेरी पुरस्कार निवडीबद्दल शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याचा आणि नेतृत्वाचा हा गौरव शिक्षक क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

## कृष्णलीला अन् दहीहंडीने आर्य चाणक्य विद्यालयात रंगला सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरात गोकुळाष्टमी व शिक्षक दिनानिमित्त संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी कृष्णलीलेवर आधारित नृत्य–नाटिका सादर करत उपस्थितांची मने जिंकली. शिक्षक दिनानिमित्त इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिनात शिक्षकांच्या भूमिका पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव केला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरलेल्या दहीहंडीत विद्यार्थ्यांच्या गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचत सहभाग घेतला. अखेर एका पथकाने दहीहंडी फोडली. गोपाळकाल्याच्या वाटपातून समरसता व ऐक्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास जुगल किशोर लोहिया, डॉ. पद्मकुमार कासलीवाल, विजय चाटुपळे, मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# ‘सावित्रीच्या लेकी’ ठरल्या यशाच्या मानकरी!

**‘मी सावित्रीची लेक पुरस्कार २०२६’ सोहळ्यात गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मान । दहावी–बारावीतील गुणवंत विद्यार्थिनींचा गुलाबी फेटा बांधून गौरव; स्त्री शिक्षण आणि महिला सबलीकरणाचा जागर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाची ज्योत तेवत ठेवत समाजासमोर आदर्श निर्माण केला. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सावेडी येथे ‘मी सावित्रीची लेक पुरस्कार २०२६’ हा प्रेरणादायी सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

स्त्री जन्माचे स्वागत व्हावे, मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहावे, या व्यापक उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रोफेसर चौकाजवळील हॉटेल रोज गोल्ड येथे दिवंगत विठ्ठल अंबी बुलबुले यांच्या प्रेरणेतून, अध्यक्ष नरेश कोटा, उपाध्यक्ष वैभव कंदी तसेच सर्व देणगीदार आणि सदस्यांच्या परिश्रमातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मंचावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा संयोजकांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तसेच अध्यक्षस्थान भूषविलेले प्रा. बत्तीन पोट्यान्ना प्राथमिक विद्यालय व श्री मार्कंडेय विद्यालयाचे चेअरमन भीमराज नारायण कोडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थिनींना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले, ‘‘सावित्रीबाई फुले यांनी स्वतः शेण–दगडांचा मारा सहन करून स्त्री शिक्षणाचा जो पाया रचला, त्याच भक्कम पायावर आजच्या या सर्व यशस्विनी लेकी अभिमानाने उभ्या आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार केवळ तुमच्या यशाचा नाही, तर स्त्रीशक्तीचा सन्मान आहे.’’ मुलींच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाचे महत्त्व समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. ‘‘तुम्ही खऱ्या अर्थाने सावित्रीच्या लेकी आहात. भविष्यात कोणतीही अडचण आली तरी शिक्षणाची कास सोडू नका. उच्च ध्येय गाठा आणि आपल्या समाजाचे तसेच देशाचे नाव उज्ज्वल करा,’’ असे आवाहन त्यांनी विद्यार्थिनींना केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून पद्मशाली सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश बाबुराव लकशेट्टी, सौ. रत्ना गणेश नजन, समाजसेविका सौ. अवंतिका चेतन सिरसुल, समाजसेवक विजयकुमार हनुमंत शेराल तसेच ‘स्त्री जन्माचे स्वागत’ उपक्रमाच्या मार्गदर्शिका कल्पनाताई विठ्ठल बुलबुले उपस्थित होत्या. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून मुलींच्या उच्च शिक्षणाचे महत्त्व, महिला सबलीकरण, आत्मनिर्भरता आणि बदलत्या काळात मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची गरज यावर विशेष भर दिला. मुलींना केवळ शिक्षण देणे पुरेसे नसून त्यांना आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि स्वावलंबनाची जाणीव करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अजय म्याना यांनी फोनवरून संपर्क साधून सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी दहावी व बारावीमध्ये यश संपादन करणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, या सर्व विद्यार्थिनींच्या डोक्यावर मानाचा गुलाबी फेटा बांधण्यात आला होता. गुलाबी फेट्यात सजलेल्या विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या पालकांच्या डोळ्यांतील अभिमानाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

या सोहळ्यास वंदनाताई दडगे, ज्योतीताई यमजाल, राहुल दुलम, निखिल कोटा, अवनी बुलबुले, प्रेरणा एक्कलदेवी, सिद्धेश कोंड्याल यांच्यासह गुणवंत विद्यार्थिनी, त्यांचे पालक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अहिल्यानगर येथील श्री.डी आर.दळवी यांची सरकारी वकील पदी निवड झाल्याबद्दल व अयुब सय्यद यांची एल.एल.बी. झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी माझी समाज कल्याण अधिकारी श्री रफिक मुन्शी, माजी नगरसेवक असिफ सुलतान, प्राचार्य शरदचंद्र पवार मेडिकल कॉलेज डॉ. रिजवानअहमद, सय्यद, शफीबाबा, शफी जहागीरदार, राष्ट्रवादी शरदपवार गट अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष साहेबान जागीरदार,सामजिक कार्यकर्ते खालीद शेख, अशफाक शेख,अजीम जहागीरदार, अफसर शेख, सय्यद रफिक, शेख फरीद, शेख आमीन सय्यद गुलाब, आदी मान्यवर उपस्थित होते. (छाया – जाकीर शेख)**

# ओबीसी युवा मोर्चाच्या सचिवपदी ओम संतोष हजारे यांची निवड

**डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान; भाजपा ओबीसी मोर्चा च्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती । दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार– ओम हजारे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भाजपा ओबीसी युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष श्रीकांत फंड यांच्या नेतृत्वाखाली तसेच भाजपा ओबीसी मोर्चाचे मार्गदर्शक व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ओम संतोष हजारे यांची भाजपा ओबीसी युवा मोर्चाच्या सचिवपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतीने माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते ओम हजारे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी भाजपा भिंगार मंडळ प्रभारी तथा जिल्हा सरचिटणीस महेश नामदे, भाजपा नगरसेवक निखिल वारे, भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष हजारे, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह भाजपा ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपा ओबीसी मोर्चाच्या माध्यमातून समाजातील युवकांना संघटित करून त्यांना विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याबरोबरच शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जात आहे. युवा कार्यकर्त्यांना संघटनेच्या माध्यमातून नेतृत्वाची संधी मिळावी आणि समाजाच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करता यावे, यासाठी मोर्चाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर ओम हजारे यांच्यावर सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, ‘‘भाजपा ओबीसी मोर्चाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे. युवक ही संघटनेची खरी ताकद असून, युवा कार्यकर्त्यांनी सामाजिक प्रश्न समजून घेऊन ते सोडविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. ओम हजारे यांच्यावर सोपविण्यात आलेली सचिवपदाची जबाबदारी ते निश्चितपणे सक्षमपणे पार पाडतील, असा विश्वास आहे.’’

ते पुढे म्हणाले, ‘‘पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी ही केवळ पद नसून जनसेवेची संधी असते. ओबीसी समाजातील युवकांना संघटित करून त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. पक्षाच्या विचारांशी बांधील राहून सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केल्यास संघटना आणखी मजबूत होईल.’’

नियुक्तीनंतर ओम संतोष हजारे म्हणाले, ‘‘भाजपा ओबीसी युवा मोर्चाच्या सचिवपदी माझी निवड करून पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे, त्याबद्दल मी खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील, शहर जिल्हाध्यक्ष श्रीकांत फंड, उपमहापौर धनंजय भाऊ जाधव तसेच सर्व वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा मनापासून आभारी आहे. पक्षाने दिलेली ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाबरोबरच जनसेवेची मोठी संधी आहे.’’ते म्हणाले, ‘‘ओबीसी समाजातील युवकांच्या प्रश्नांसाठी आवाज उठविण्यासोबतच त्यांना शासनाच्या विविध योजना व उपक्रमांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. पक्षाची विचारधारा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवून अधिकाधिक युवकांना संघटनेशी जोडण्याचे काम करणार असून, वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे व सक्रियपणे कार्य करेल.’’

# श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी विभाग येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्यामंदिर, सावेडी विभाग येथे श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभाग सावेडी आणि श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक, माध्यमिक विभाग सांगळे गल्ली या सर्व विभाग मिळून भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

गौरी गदादे व वर्षा कणकर यांनी सादर केलेले सुंदर स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय माध्यमिक विभाग येथील पर्यवेक्षिका शारदा होशिंग यांनी करून दिला.

यावेळी संस्थेचे चेअरमन वि. ल. सोनटक्के यांनी मनोगत व्यक्त करताना श्री समर्थ विद्यामंदिर शाळेची स्थापना करण्यामागील इतिहास व त्यामागील उद्देश याविषयी माहिती दिली. तसेच सांगळे गल्ली येथील प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन आणि सावेडी विभाग येथील प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळे, चेअरमन वि. ल. सोनटक्के, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सेक्रेटरी प्र. स. ओहोळ, सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, सदस्य ॲड. किशोर देशपांडे, स्वानिल कुलकर्णी, संध्या कुलकर्णी, सुनील जोशी, सचिन क्षीरसागर, श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी, माध्यमिक विभाग सांगळे गल्ली येथील मुख्याध्यापक सुनील कानडे, श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, सावेडी विभागाच्या पर्यवेक्षिका शारदा होशिंग आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा आली.

काका ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने देण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त संस्थेचे शिक्षक अरुण राशीनकर, श्रुती कुलकर्णी, हेमलता शिंदे, अश्विनी जाधव यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

संजय कुलकर्णी यांच्या कल्पनेतून शाळा प्रथम सुरू झाली, त्यावेळेस असणाऱ्या पहिल्या शिक्षकांची सुंदर अशी प्रतिमा तयार करून तिचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. संजय कळमकर, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी, नेवासा यांनी आपल्या मनोगतात पालकांच्या शिक्षणाबाबत वाढलेल्या अपेक्षा, शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता () मुळे होणारे बदल तसेच शिक्षक आणि शिक्षकासमोरील विविध आव्हाने यावर गमतीशीर व मिश्कील शैलीत भाष्य केले. त्यांनी आपल्या भाषणातून अनेक विनोद व उदाहरणे सांगत उपस्थितांना खिळवून ठेवले. घरातील वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर होणारा परिणाम, शिक्षकांनी बहुश्रुत असावे, सातत्याने वाचन करावे आणि ‘‘वर्ग हाच स्वर्ग आहे’’ या भावनेने अध्यापन करावे, असा मौलिक संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मगर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले. शेवटी संस्थेचे सदस्य सुनील जोशी यांनी आभार मानले.

# उपनगर मधील पहिला सार्वजनिक मंडळ विनायकराजं प्रतिष्ठाण मानाचा गणपतीची वासापुजन उत्साहात साजरी– विपुल वाखुरे पाटिल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** विनायकराजं प्रतिष्ठाण (उपनगर मधील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव) गुलमोहर रोड येथील गेल्या १८ वर्षी पासुन दरवर्षी प्रमाणे येणार्या बाप्पांचे स्वागतासाठी उभारण्यात येणार्या मंडपाची पुजा सर्व जेष्ठ मंडळीचा आणि सदस्यासह केली यावेळी प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष विपुल वाखुरे पाटिल,व उपाध्यक्ष विनय वाखुरे पाटिल यांनी गेल्या १८ वर्षापासुन चा कार्यास उजाळा दिला, मंडळाच्या वासापूजन गुलमोहर रोड येथील रिद्धी–सिद्धी कॉलनी व मित्र परिवारांचा वतिने करण्यात आली यावेळेस राठोड सर, कॅप्टन मोहित संगमकर, प्रदिप दादा वाखुरे,सचिन जी निक्रड, विशाल जी साबळे, रुद्रेश आंबाडे, रॉबीन करेरा, साई शिंदे,अर्थव शेलार, निखील मोयल, साळवे साहेब, अनिल लगड, संतोष जानराव, किशोर मगर, अजय काळे, सुदाम शेडाळे, सार्थक साळवे, अमोल कराळे, ईश्वर कोळी, विकास सदाफुले, यादींसह सदस्य उपस्थित होते.

# करा काम जरा हटके, होतील कमी कुत्रे भटके – जाणीव फाऊंडेशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भटक्या कुत्र्यांचा त्रास रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याबाबतचे निवेदन जाणीव फाऊंडेशनच्या वतीने मोहटादेवी ट्रस्टचे विश्वस्त नोटरी पब्लिक ॲड. विक्रम वाडेकर, बांधकाम व्यावसायिक प्रदीप वाखुरे, प्रा हर्षल आगळे, उद्योजक विकास गायकवाड, राहुल जोशी, ॲड. व इंजिनीअर कैलाश दिघे इत्यादींच्या हस्ते म न पा आयुक्त यशवंत डांगे साहेब यांना देण्यात आले.

सध्या शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास भयंकर वाढला असून सर्वसामान्य जनजीवन गंभीरपणे बाधित होत आहे. विशेषत: लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिक यांना कुत्र्यांच्या भीतीपोटी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.

गेल्या काही दिवसांत अनेक लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिकांना भटके कुत्रे चावले आहेत. कुत्रा चावेल या भीतीपोटी लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिक यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी या वेळी आयुक्त साहेबांनी हॉटेल चालक, खानावळी, फूड स्टॉल–मॉल इत्यादींना त्यांच्या उरलेला कचरा, चिकन–मटण विक्रेत्या दुकानदारांनी मांस व संबंधित कचरा इत्यादी नाला–रस्त्याच्या कडेला टाकू नये, तो घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन केले आहे. कुठेही असा कचरा टाकल्याने तेथे कुत्र्यांचे प्रमाण वाढले आहे. कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी फक्त मनपाची यंत्रणा पुरेशी नाही तर सजग नागरिक व समाजसेवी संस्थांनी सहभाग घेणे अपेक्षित आहे. कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी मनपाकडून त्वरित आणि प्रभावी कारवाई होईल, अशी आमची रास्त अपेक्षा आहे, ज्यामुळे आपल्या शहरातील सर्वसामान्य नागरिक भटक्या कुत्रांपासून सुरक्षित राहतील, असे निवेदनात म्हटले आहे.

# सर्पदंशाने शेतकरी बबन बर्वे यांचा मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** शेतात पाणी देण्यासाठी गेलेल्या एका शेतकऱ्याचा सर्पदंशामुळे उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नेवासा तालुक्यातील दिघी येथे घडली. पद्माकर उर्फ बबन साहेबराव बर्वे (वय ४३, रा. बर्वे वस्ती, दिघी, ता. नेवासा) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

पद्माकर बर्वे हे आपल्या शेतात पाण्याची मोटर सुरू करून उसाच्या बांधावर काम करत होते. दरम्यान, गवतात लपून बसलेल्या विषारी सापाने त्यांच्या पायाला चावा घेतला. सर्पदंश झाल्याचे लक्षात येताच नातेवाइकांनी त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथील प्रथमोपचारानंतर



त्यांची प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. घाटी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू असताना अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

(पान १ वरून)

## कायदा–सुव्यवस्थे राखण्यासाठी लोकप्रतिनिधींशी समन्वय गरजेचा

लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेला प्रतिनिधी हा जनतेचा खरा आवाज असतो. कायदे आणि नियमांची अंमलबजावणी कठोरपणे झालीच पाहिजे, यात दुमत नाही; परंतु केवळ लाठी आणि कलमांचा धाक दाखवून सामाजिक सौहार्द टिकवता येत नाही. अनेक नाजूक आणि संवेदनशील प्रसंगी जनतेचा विश्वास असलेले लोकप्रतिनिधीच सामंजस्याने तणाव निवळू शकतात. अहिल्यानगर शहरात साजरे होणारे धार्मिक सण, उत्सव किंवा निघणाऱ्या मिरवणुका या वेळी उपाधीक्षक दिलीप टिपरसे यांच्याकडून नियमांवर बोट ठेवून आडमुठी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप नागरिक व कार्यकर्त्यांमधून होताना दिसत आहे, याकडे पोलीस प्रशासनानेही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. धीरज परदेशी खून प्रकरणापासून ते आजवर शहरातील विविध मंडळांचे कार्यकर्ते, नागरिक आणि हक्कासाठी शांततेत आंदोलन करणाऱ्यांवर थेट कारवायांचा बडगा उगारण्यात आला. या सर्व प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता परस्पर निर्णय घेतले गेले. पोलीस अधिकाऱ्यांची ही एकतर्फी कार्यपद्धती शहराच्या शांततेला बाधा पोहोचवणारी ठरत आहे.

धीरज परदेशी हत्या प्रकरणानंतर स्वत: आमदार संग्राम जगताप यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन उपअधीक्षक टिपरसे यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र आक्षेप नोंदवला होता. पोलिसांकडून हिंदू तरुणांना नाहक टार्गेट केले जात असल्याचा थेट आरोप त्यांनी केला होता. त्यातच नुकत्याच पार पडलेल्या गोकुळाष्टमीच्या सणावेळी मुकुंदनगर परिसरात दहीहंडी साजरी न करण्यासाठी कार्यकर्त्यांवर दबाव आणल्याचा आरोप झाल्याने हा वाद अधिकच चिघळला आहे.

संजय बारकुंड यांच्यावरील
कारवाई नगरकरांच्या स्मरणात

आमदार संग्राम जगताप हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील आमदार म्हणून ओळखले जातात. टिपरसे यांच्या विरोधात आपण मुख्यमंत्र्यांकडे गाऱ्हाणे नेणार असल्याचे त्यांनी आधीच स्पष्ट केलेले आहे. अशा लोकप्रतिनिधीने एखाद्या पोलीस अधिकाऱ्यावर सातत्याने आरोप करणे व त्यामुळे शहरातील कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न चर्चेला येणे अनावश्यक ठरते. यापूर्वी नगरमध्ये कार्यरत असलेले अप्पर पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांच्यावर अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाल्यानंतर तडकाफडकी निलंबनाची कारवाई झाली होती. या कारवाईचे कारण वेगळे असले तरी त्यामुळे शहराच्या लौकिकाला हानी पोहचली होती. अधिकाऱ्यांवर अशा कारवाया होणे शहराच्या लौकिकाच्या दृष्टीनेही चांगले ठरत नाही याचे भान प्रशासन व लोकप्रतिनिधींनीही ठेवणे आवश्यक आहे.

## ...सायबर ठगांना उत्तर प्रदेशातून अटक

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींनी ऑक्टोबर २०२५ ते जुलै २०२६ या कालावधीत प्रोसेसिंग फी व इतर विविध कारणांच्या नावाखाली तक्रारदाराकडून ऑनलाइन पद्धतीने ८४ लाख ५३ हजार रुपये उकळले होते.गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सागर ढिकले यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. आरोपी उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यात बनावट नावाने खोली भाड्याने घेऊन राहत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार विशेष तपास पथकाने बांदा येथे जाऊन कौशल्याने सापळा रचला आणि दोन्ही आरोपींना मुद्देमालासह बेड्या ठोकल्या. सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असून यापूर्वीही त्यांच्याविरुद्ध पंजाब आणि गुजरात राज्यात अशाच प्रकारचे फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

## भगवानबाबा मल्टीस्टेट फसवणूक प्रकरण, चार गुन्ह्यांतील फरार आरोपीला बेड्या

गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने जामखेड शहरात सापळा रचून दिनेश वैद्य याला ८ सप्टेंबर रोजी शिताफीने ताब्यात घेतले.कारवाईनंतर आरोपीला पुढील तपासकामी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, अंमलदार बिरप्पा करमल, बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, भगवान सानप, फुरकान शेख, प्रशांत राठोड, भगवान धुळे व सुनीता पवार यांच्या पथकाने केली.

## व्याजाचा दट्ट्या लावून जमीन हडपणारे दोन सावकार जेरबंद

न्याय संहिता तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली संदिप पवार, विजय ठोंबरे, सतीष भवर व किरण ठुबे यांच्या पथकाने ७ सप्टेंबर रोजी तारकपूर परिसरातून दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन तोफखाना पोलिसांच्या स्वाधीन केले.